# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे
# उपसंहार

अशाप्रकारे आपण वरील चार प्रकरणांच्या आधारे श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललितगद्य लेखनाचे स्वरूप विस्ताराने पाहिले. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या या ललितगद्य लेखनाचा अनेकअंगाने विचार केल्यानंतर त्यांचे काही गुणविशेष आपल्या लक्षात येतात. हेच गुणविशेष अथवा अभ्यासाअंती आलेले निष्कर्ष आपण या प्रकरणात संक्षिप्त स्वरूपात मांडणार आहोत. यातूनच त्यांच्या एकूणच ललितगद्य लेखनाचे विशेष इथे नोंदविले जाणार आहे.

इतर साहित्यप्रकारांप्रमाणे लघुनिबंधाचे मूळही पाश्चात्य साहित्यामध्येच सापडते. बेकन, अब्राहम, अडिसन, स्टील, गोल्डस्मीथ या इंग्रजीतील मान्यवर निबंधकारांच्या लेखनापासून प्रेरणा घेऊनच आपल्याकडील लेखकांनी लघुनिबंध लेखन सुरू केले. या लघुनिबंधामध्ये 'मी' च्या आत्माविष्कारास प्राधान्य असल्यामुळे अल्पावधीतच हा प्रकार लोकप्रिय झाला व त्याचबरोबर त्याचा विस्तारही घडून आला. याच लघुनिबंधाचे ललितनिबंधाचे स्वातंत्र्योत्तर काळात अधिक विकसीत झालेले काव्यात्म, ललितरम्य रूप म्हणजेच 'ललितगद्य' होय. निबंध-लघुनिबंध-ललितनिबंध-ललितगद्य या विस्तृत अशा वाटचालींमध्ये अनेक समर्थ अशा लेखकांनी आपल्या गुणात्मक अशा लेखनाने 'ललितगद्य' हा वाङ्मयप्रकार समृद्ध केला आहे.

१९६० नंतरच्या कालखंडात 'ललितगद्य' या वाङ्मयप्रकारात आपल्या तरल, निखळ काव्यात अशा ललितगद्य लेखनाने एक मानाचे स्थान प्राप्त केलेले लेखक म्हणजे श्रीनिवास कुलकर्णी हे होत. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललितगद्य लेखनाने मराठी ललितगद्य लेखनाला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे.

पहिल्या प्रकारणामध्ये आपण ललितगद्य लेखनाचे स्वरूप आणि मराठीतील एकूणच ललितगद्य लेखनाची वाटचाल यांचा थोडक्यात आढावा घेतला. यामध्ये ललितगद्याच्या स्वरूपावर प्रकाश टाकला असता आपल्याला असे दिसते की लघुनिबंधाचे तंत्रनिष्ठ, खेळकर स्वरूप लुप्त होऊन 'ललितगद्य' हे अधिक आत्मनिष्ठ, लवचिक बनले. 'ललितगद्य' ही मुळातच व्यापक संकल्पना आहे. यामध्ये 'लघुनिबंध', 'आठवणी-अनुभव', 'प्रवासवर्णन', 'ललितलेख' आणि 'व्यक्तिचित्रे' या अनेक स्फुट अशा वाङ्मयप्रकारांचा 'ललितगद्या'च्या जोडीने चहूअंगाने विकास होत गेला आहे. या ललितगद्याच्या वरील सर्व उपप्रकारांमध्ये प्रामुख्याने 'मी' च्या मुक्त आत्माविष्काराला प्राधान्य मिळाले आहे. तसेच काव्यात्मता व चिंतनात्मकता हे ललितगद्यचे प्रमुख विशेष होत.

मराठी ललितगद्य लेखनाची वाटचाल पहात असताना असे लक्षात येते की इंग्रजीतील 'पर्सनल एसे' पासून प्ररणा घेऊन १९२५ मध्ये मराठीत लघुनिबंध अवतरला. याचे श्रेय प्रामुख्याने जाते ते ना. सी. फडके आणि वि. स. खांडेकर यांना. तर १९३५ नंतरच्या कालखंडात गं. भा. निरंतर, कुसुमावती देशपांडे आणि ना. मा. संत या लेखकांनी लघुनिबंधाला नवे रूप देऊन एक नवा ललितनिबंध रूढ केला. पण या ललितनिबंधाला खरे नवचैतन्य प्राप्त झाले ते ईरावती कर्वे यांच्या 'परिपूर्ती' या ललितगद्य संग्रहाच्या निर्मितीनंतर.

यानंतरच्या कालखंडामध्ये गो. वि. करंदीकर, दुर्गा भागवत, मंगेश पाडगावकर, प्राणहिता आणि श्रीनिवास कुलकर्णी यांनी आपल्या विपुल आणि वैशिष्ट्यपूर्ण लेखनाने 'ललितगद्य' लेखन अधिक काव्यात्म, चिंतनशील बनविले तर व्यंकटेश माडगूळकर आणि मारूती चितमपल्ली यांनी अस्सल निसर्ग-वन्य जीवन चित्रण हा नवा चित्रणविषय मराठी ललितगद्यात आणला. १९६० नंतरच्या कालखंडामध्ये इतर साहित्यप्रकारांप्रमाणेच ललितगद्यामध्येही ग्रामीण आणि दलित अनुभवविश्वाची समृद्ध

परंपरा निर्माण झाली आहे. समाजदर्शनाच्या प्रेरणेतूनही ललितनिबंध पुढील काळात लिहिला गेला आहे. आणि याचमुळे 'ललितगद्य' हा वाङ्मयप्रकार चहूअंगानी विस्तारत गेला आहे.

दुसऱ्या प्रकरणात आपण श्रीनिवास कुलकर्णी यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली त्यासाठी कोणकोणते घटक कारणीभूत ठरले यांचा सविस्तर विचार केला. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्ययुक्त अपुभवविश्वाचा परामर्श घेत असताना त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाला दुर्लक्षिता येत नाही. त्यांच्या व्यक्तीमत्त्वाच्या घडणीचा, संवेदन स्वभावाचा व लेखनाच्या संबंधाचा विचार केला आहे. बालपणापासून श्रीनिवासांच्या व्यक्तिमत्त्वावर घरातील मोठ्या व्यक्तींच्या, भोवताल्या निसर्गरम्य, धार्मिक वातावरणाचा साहित्यसंमेलनामुळे निर्माण होणाऱ्या वाङ्मयीन वातावरणाचा, अनेक लेखकांचा आणि थोरामोठ्यांचा लाभलेला सहवास यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कोणते संस्कार झाले आहेत, त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले आहे. याचा विचार केला आहे.

तिसऱ्या प्रकरणामध्ये श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललितगद्य लेखनाच्या सर्वात महत्त्वाच्या घटकाचा विचार केला आहे. तो महत्त्वाचा घटक म्हणजे यांच्या लेखनातून प्रकटणारे वैविध्यपूर्ण असे अनुभवविश्व. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या लेखनातून प्रकटणारे अनुभवविश्व हे वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. त्यांच्या अनुभवविश्वातून प्रकटणारे निसर्गवर्णन, बालविश्वाचे अनोखे दर्शन, असामान्य व्यक्तिचित्रे आणि अध्यात्मिक, अतींद्रिय स्वरूपाचे खास वेगळे असे अनुभवविश्व यांच्या ललितलेखनातून प्रकटते.

श्रीनिवास कुलकर्णी यांनी निसर्गाच्या विविध रूपांचे अनोखे, मनमोहक असे दर्शन घडवीत असताना निसर्गातील विविध वृक्ष-वेली, पशू-पक्षी, ऊन, वारा, पाऊस या मुख्य निसर्गातर्गघटकांना एक स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्व बहाल करून त्या-त्या

निसर्गघटकांचे स्वतंत्र असे विशेष आपल्यापुढे प्रकट केले आहेत. या निसर्गवर्णनामागे त्यांचा निसर्ग आणि मनुष्य यातील नातेसंबंध शोधणे हा प्रधान उद्देश आहे. यातून त्यांचे निखळ, निस्सीम अशा स्वरूपाचे निसर्गप्रेमच प्रकटते. तसेच त्यांनी आपल्या बालविश्वपर अनुभवविश्वामध्ये विविध रम्य, लोभस अशी मुले त्यांच्या स्वभाव विशेषांसह, वृत्ती – प्रवृत्तीसह जिवंत स्वरूपात आपल्या पुढे उभी केली आहेत. हे करत असताना त्यांनी या बालमनांतील निरागसता, स्वप्नसृष्टी, जिज्ञासा,त्यांचे विविध खेळ हे प्रमुख विशेष अचूक टिपल्यामुळे या बालविश्वाच्या चित्रणाला वेगळेपणा प्राप्त झाला आहे.

याचपद्धतीने त्यांनी आपल्या व्यक्तिचित्रणपर अनुभवविश्वामध्ये विविध स्वरूपाच्या व्यक्तिरेखा ललितरम्य भाषेत रेखाटल्या आहेत. या व्यक्तिचित्रणांमागे श्रीनिवास कुलकर्णी यांचा त्या त्या सामान्य व्यक्तींमधील असामान्य अशा गुणांचे, कलेचे अथवा त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे वाचकांना दर्शन घडविले आहे. श्रीनिवास कुलकर्णी यांनी ही व्यक्तिचित्रे रेखाटत असताना त्या व्यक्तीचे केवळ बाह्यवर्णन करीत नाहीत तर यांच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांचे यथातथ्य चित्रण करतात.

श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललितगद्य लेखनातून प्रकटणारे अध्यात्मिक–अतींद्रिय अशा स्वरूपाच्या अनुभवविश्वावर जरी नजर टाकली तर त्यांच्या लेखनाचे आणि पर्यायाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही वेगळेपण विशेषत्वाने ध्यानात येते. आपल्या अध्यात्मपर अनुभवविश्वामध्ये त्यांनी अनेक सिद्ध साधूपुरूषांचे, त्यांच्या साधनांचे, चमत्कारांचे वर्णन केले आहे तर त्यांनी अतींद्रिय अनुभवविश्वामध्ये स्वप्न, भास, मृत्यू, पुनर्जन्म या विशेष घटकांच्या संदर्भात आपले एंद्रियजाणिवेपलिकडचे तरल, निखळ असे अनुभवविश्व प्रकट केले आहे. यावरून त्यांच्या अनुभवविश्वाची वैविध्यता आपल्या ध्यानात येते.

एखाद्या कलाकृतीमध्ये तिच्या आशयाप्रमाणेच त्या कलाकृतीच्या अभिव्यक्ती सौंदर्यालाही तेवढेच महत्त्व दिले जाते. त्यांच्या ललितलेखनाला कोणत्या आविष्कार घटकांनी वाङ्मयीन गुणवत्ता प्राप्त झाली आहे. त्या घटकांचा इथे विचार केला आहे. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललितलेखनातील काही भाषिक विशेषांचा, निवेदन सामर्थ्यांचा विचार या प्रकरणात मांडला आहे. म्हणूनच चौथ्या प्रकरणामध्ये श्रीनिवास कुलकर्णी यांच्या अभिव्यक्ती विशेषांचा विचार केला आहे. त्यांच्या या अभिव्यक्ती विशेषांमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त होते ते त्यांच्या काव्यात्म भाषाशैलीला. मूळ काव्यात्म वृत्ती, प्रतिमांचा केलेला समर्पक वापर, बालपणाविषयीची अनामिक हूरहूर या विशेषांमुळे त्यांचा अनुभव काव्यमय स्वरूपात प्रकटतो. चिंतनात्मकता हाही त्यांच्या ललितगद्यलेखनाचा प्रमुख विशेष, अनुभव प्रकट करीत असताना अगदी सहजतेने चिंतनाच्या पातळीवर उतरणे हे त्यांचे विशेष. याबरोबरच श्रीनिवास कुलकर्णींनी वापरलेले खास घडविलेले शब्द, विशेष असे ग्रामीण शब्द, म्हणी व वाक्प्रचार तसेच लहान मुलांचे वापरलेले वेगळे असे शब्द हे त्यांच्या अभिव्यक्तीचे महत्त्वाचे विशेष ठरतात.

याबरोबरच त्यांनी आपल्या लेखनात वैपुल्याने आणि वैविध्यपूर्ण अशी वापरलेली प्रतिमासृष्टी ही आपले लक्ष वेधून घेताना दिसते. मानव आणि निसर्ग यांतील साम्य शोधण्याचा प्रयत्न श्रीनिवास कुलकर्णी यांनी आपल्या प्रतिमांच्या माध्यमातून केला आहे. याबरोबरच श्रीनिवास कुलकर्णी यांनी आपल्या ललितगद्य लेखनात संवादाचा केलेला विपुल वापर, अनुभवाचे विनोदी शैलीत केलेले वर्णन आणि समाजात रूढ असणाऱ्या दंतकथांचा, समज-संकेतांचा केलेला वापर त्यातून लेखांना प्राप्त झालेले गूढ वलय या सर्व घटकांनी त्यांचे ललितगद्य लेखन अभिव्यक्तीदृष्ट्या परिपूर्ण बनविले आहे. त्यांच्या ललितगद्य लेखनांचे अनुभवविश्व जसे वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे तसेच त्यांच्या लेखनाचे अभिव्यक्ती विशेषही वैविध्यपूर्ण असे आहे. या

अभिव्यक्तिविशेषांनी त्यांच्या ललितलेखनाला वरच्या दर्जाची कलात्मता प्राप्त करून दिली आहे. याचाच परिणाम म्हणून श्रीनिवास कुलकर्णी यांचे ललितगद्य लेखन मराठी साहित्यात अपूर्व असे ठरले आहे.

अशा प्रकारे १९६० नंतरच्या कालखंडात श्रीनिवास कुलकर्णी यांनी आपल्या काव्यात्म, तरल अशा वैशिष्ट्यपूर्ण ललितगद्य लेखनाने एकूणच मराठी ललितगद्य क्षेत्राला समृद्ध बनविले आहे. आशय व अभिव्यक्तिदृष्ट्या हे ललितगद्य मराठीत नाविन्यपूर्ण ठरले आहे. आधुनिक मराठी ललितलेखनात अतिशय समृद्ध व वैशिष्ट्यपूर्ण ललितगद्य श्रीनिवास कुलकर्णी यांनी लिहिले आहे. त्यांच्या या लेखनाचा प्रभाव पुढील ललितगद्य लेखकांवर पडलेला दिसतो. यामुळेच या लघुप्रबंधाद्वारे श्रीनिवास कुलकर्णी यांच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा लेखनाचा चहूअंगाने परामर्श घेतला आहे.